दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/००८/२०१९
दि.०४/०२/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.संतोष कुमार तिवारी, ................अपिलार्थी
सी०४, न्यु मिरा पैराडाईज,
गिता नगर जुना पेट्रोल पंपच्या मागे,
मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पूर्व).

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.संतोष कुमार तिवारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२१/१२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) यतीन जाधव (ज़ु.इंजि.) के संबंध मे निम्न दस्ताऐवज प्रदान करे।
२) इन्हे कब से प्रभारी उप-अभियंता का कार्यभार दिया गया है, इसके आदेश की प्रत प्रदान करे।
३) सन २००७ से अब तक यह किस किस विभाग मे कार्य किया इससे संबंधित दस्ताऐवज प्रदान करे।
४) महाराष्ट्र राज्य मे "दफ्तर दिरंगाई कायदा" २००५ लागू होने के बाद भी इन्हे प्रभारी उप-अभियंता के पद पर किस आधार पर अब तक रखा गया है वह प्रत दे।
५) इतने समय पर एक ही पद पर बने रहने पर मनपा दुबारा किसी प्रकार का आदेश आया है तो उसकी प्रत प्रदान करे।
६) मनपा के पास इनसे वरिष्ठ (प्र.इंजि.) है तो उसकी प्रत प्रदान करे।
७) इतने समय ११ वर्षो तक पद पर (अति.प्रभार) बने रहने पर कौन अधिकारी जबाबदार है बताये।

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत मागितलेली माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.२३/०१/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०१/०२/२०१९ रोजी सायं.०५.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/००९/२०१९ दि.३०/०१/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु सदर दिवशी मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) हे वार्षिक अर्थसंकल्पीय बैठकीसाठी उपस्थित असल्याने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.०४/०२/२०१९ रोजी सायं.०५.०० वाजता आयोजित करण्यात आली असुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/०१३/२०१९ दि.०१/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.२१/१२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्याने सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

५/२/१९

**प्रति:-**

१) श्री.संतोष कुमार तिवारी, स्पीड पोस्ट
सी०४, न्यु मिरा पैराडाईज,
गिता नगर जुना पेट्रोल पंपच्या मागे,
मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पूर्व).

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.